महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षिमित्र

■ वर्ष – तेरावे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०२२ ■ पाने –२०



## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

**सहाय्यक संपादक**

Ir. {H$aU _moao,अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com
Ir. A{Zb _mir, नाशिक, मो. ९८५०८१८६४४
Email: anilrmali@yahoo.co.in

## कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **श्री. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे** (वर्धा)<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल** (ठाणे)<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी** (मुंबई)<br>**मो. ९८६९५५९९२२** |

## सल्लागार मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## आणि आता तिसरे 'रामसर'


**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com




नुकतीच ठाणे खाडी ही रामसर क्षेत्र असल्याची घोषणा झाली आहे. महाराष्ट्रातील हे तिसरे रामसर क्षेत्र आहे. देशात आता एकूण ७५ रामसर क्षेत्रे झाली आहेत. रामसेर क्षेत्र जाहीर झाल्यावर त्याचा विकास करण्याकडे अधिक लक्ष देण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारवर पर्यायाने त्या राज्यातील वन विभागाकडे येते. त्या विकासात त्या क्षेत्राचा पर्यटकांसाठीचा उपयोग राज्याच्या पर्यटन विभागाने नांदूरमध्यमेश्वर येथे महापक्षी महोत्सव भरवून पार पाडला. अप्रत्यक्षपणे त्याला यशही आले. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बिटर्न (तापस) पक्ष्यांनी नांदूरमध्यमेश्वर येथे घरटी केल्याचे वृत्त आले. यापूर्वी त्यांची वीण तिथे झाल्याचे ज्ञात नव्हते.

दोन दिवसांपूर्वी तेथील अंदाधुंद कारभाराचे वृत्त हाती आले. बेशरमीचा नायनाट करत असताना रामबाणाचीही तोड करण्यात आली. त्या गचपणात काही पक्ष्यांची घरटी होती. तीही नष्ट झाली. नाशिक शहरातील व निफाड येथील पक्षीमित्रांनी ओरड केली. निवेदन दिले; पण नुकसान तर होऊन गेले होते.

प्रत्येक रामसर क्षेत्रासाठी तज्ज्ञांची सल्लागार समिती नेमली गेली पाहिजे, अशी मागणी करत आहे. कोणतेही महत्त्वाचे काम हाती घेण्यापूर्वी तो विषय सल्लागार समितीपुढे मांडला गेला पाहिजे.

रामसर क्षेत्राचा फार मोठा विकास करायचा असेल तर त्यासाठी जागतिक संघटनेकडून आर्थिक मदत मिळू शकते; पण तत्पूर्वी वनविभागाने त्यासाठीच्या प्रकल्पाचा संकल्प केला पाहिजे. त्यासाठी किती मोठा निधी लागेल, याचा अंदाज तयार केला पाहिजे. लोणार सरोवरास हा दर्जा मिळालेला आहे. उल्कापाताने तयार झालेल्या खड्ड्यातील सरोवर हे जगातील एकमेव क्षेत्र असावे. त्यादृष्टीने ते जागतिक महत्त्वाचे आहे. त्याच्या विकासासाठी जागतिक संघटनेकडून आर्थिक मदत मिळवणे शक्य आहे. म्हणून तिथे महत्त्वाचा महाप्रकल्प राबविण्याचा आणि त्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम राज्य सरकारच्या वन खात्याने हाती घ्यावी, असे सुचवू इच्छितो.

**मुखपृष्ठ - Bonelli's Eagle ( बोनेलीचा गरूड ) छायाचित्र - शशांक नगराळे**

# ✽ अध्यक्षीय ✽




**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773


आपला देश स्वातंत्र्याची ७५ वर्षेपूर्ण करीत असताना या अमृत महोत्सवी वर्षात भारतातील एकूण ७५ ठिकाणांना रामसर स्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यापैकी २१ ठिकाणांची घोषणा १५ ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वी म्हणजेच ऑगस्ट महिन्यात ३ आणि १३ ऑगस्ट २०२२ रोजी करण्यात आली. त्यामध्ये अनुक्रमे १० व ११ पाणथळ ठिकाणांना रामसर स्थळे म्हणून घोषित करण्यात आले होते. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी ७५ चा हा टप्पा १५ ऑगस्ट पूर्वी पार होणे ही एक मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. हा ७५ चा आकडा प्राप्त करण्यासाठी सरकारला गेल्या वर्षभरात नियोजनबद्ध कार्यक्रम करावा लागला असेल यात शंकाच नाही.

इराणमधील रामसर शहरात १९७१ साली भरलेल्या 'कन्व्हेन्शन ऑन वेटलॅण्ड्स' या जागतिक परिषदेला 'रामसर परिषद' मानले जाते. या परिषदेत जगातील महत्त्वपूर्ण पाणथळ जागांचे संवर्धन व त्यांच्या पर्यावरणपूरक व शाश्वत वापराचा निर्णय घेण्यात आला. हा करार आपल्या देशाने १९८२ मध्ये स्वीकारल्यानंतर भारतात रामसर ठिकाण जाहीर करण्याची प्रक्रिया सुरु झाली. भारतातील पहिली दोन रामसर स्थळे ०१ ऑक्टोबर १९८१ ला घोषित झालीत ती म्हणजे ओरिसातील चिलिका लेक आणि राजस्थानातील केवलदेव राष्ट्रीय उद्यान. त्यानंतर पुढील काळात २००० सालापर्यंत भारतातील महत्वाच्या एकूण ०६ पाणथळ प्रदेशांना हा दर्जा प्राप्त झाला होता. २००० सालानंतर या प्रक्रियेने वेग घेतला आणि २०१३ सालापर्यंत आणखी २० ठिकाणांचा रामसर स्थळ म्हणून समावेश झाला. त्यानंतर २०१४ ते २२ दरम्यान आजवर त्यामध्ये पुन्हा ४९ ठिकाणांचा समावेश होऊन अमृत महोत्सवी वर्षात ७५ ठिकाणांचा टप्पा पूर्ण झाला आहे. या शिवाय भारतात आणखी कितीतरी अशी ठिकाणे आहेत जी रामसर पात्रतेत बसतात. महाराष्ट्रातसुद्धा अनेक ठिकाणं या निकषात बसण्यायोग्य असून त्यामध्ये जायकवाडी पक्षी अभयारण्य (जि. औरंगाबाद), वेंगुर्ला रॉक्स (बर्न्ट आयलंड), माहूल शिवडीची खाडी (मुंबई), उजनीचे धरण (जि. पुणे-सोलापूर), हतनूर धरण (जि. जळगाव), नवेगावबांध (जि. गोंदिया), या स्थळांचा समावेश होतो. विशेष म्हणजे यातील सर्वच ठिकाणं ही पक्षी संपन्नतेच्या निकषात बसणारी असल्यामुळे पक्षी संवर्धनात पाणथळ संवर्धनाचे महत्व स्पष्ट होते. याशिवाय राज्यात या निकषात बसणाऱ्या अजूनही अनेक पाणथळी आहेत, ज्यावर मोठ्या संख्येत पक्षी प्रजाती अवलंबून आहेत. अशा पाणथळांवर पक्षिमित्रांनी व अभ्यासकांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून पक्षी नोंदणी व अभ्यास केल्यास भविष्यात अशा आणखी काही ठिकाणांना रामसर दर्जा मिळण्यासाठी प्रस्तावित केले जाऊ शकते. रामसर स्थळ हा पक्षी संवर्धनातील एक महत्वाचा दुवा आहे. त्यानुसार भविष्यात यामध्ये अनेक स्थळांचा समावेश होणे गरजेचे आहे. जैवविविधता आणि जल संवर्धनाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे ठरणार आहे.

इन्स्टिट्यूशन ऑफ ग्रीन इंजिनिअर्स (IGEN) या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे आपल्या महाराष्ट्र 'पक्षिमित्र'ला २०२१ चा आंतरराष्ट्रीय आयजीइएन आयव्हीडी स्वयंसेवक पुरस्कार (IGEN IVD Volunteer Reorganization Award 2021) जून २०२२ ला जाहीर झाला होता या पुरस्काराचा वितरण सोहळा ऑनलाईन पद्धतीने दिनांक ०३ सप्टेंबर रोजी पार पडला. या कार्यक्रमात संस्थेला प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह सांकेतिक स्वरुपात प्रदान करण्यात आले. धुळे शहरात पहिले विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन संपन्न झाले. धुळे येथील निसर्गवेध संस्थेच्या विद्यमाने आणि या संस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र पक्षिमित्रचे धुळे जिल्हा समन्वयक, डॉ विनोद भागवत यांच्या पुढाकाराने दि. १५ सप्टेंबर २०२२ ला रविवारी संपन्न झाले. प्रथम अकोला शहरातून सुरु झालेला हा उपक्रम पुढे वर्धा, ठाणे या ठिकाणी सुरु झाला. आता धुळे शहराच्या निमित्ताने उत्तर महाराष्ट्रात सुद्धा या उपक्रमाची सुरुवात झाली. भविष्यात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन व्हावे

यासाठी पक्षिमित्रच्या सभासदांनी पुढाकार घ्यावा, महाराष्ट्र पक्षीमित्रकडूनसुद्धा काही मदत करता येऊ शकेल का याबाबत आम्ही विचार करीत आहोत. विद्यार्थी पक्षिमित्र संमेलनाच्या आयोजनांमुळे भविष्यात पक्षिमित्र आणि पक्षी अभ्यासक निर्माण होण्यास मदत होणार यात शंकाच नाही. निसर्गवेध संस्थेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, आयोजन समिती तसेच या संस्थेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र पक्षीमित्रचे धुळे जिल्हा समन्वयक, डॉ विनोद भागवत या सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन!

नाशिकमध्ये सुध्दा विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन २४ सप्टेंबर रोजी पार पडले. नाशिक शहरासाठी पहिल्यांदाच झालेले हे संमेलन पक्षिमित्र मंडळ नाशिक या संस्थेने आयोजित केले होते महाराष्ट्र पक्षिमित्रचे सहसंघटक श्री. अनिल माळी,पक्षिमित्रचे जेष्ठ मार्गदर्शक संपादक श्री. दिगंबर गाडगीळ, श्री. मधुकर जगताप यांनी सदर आयोजनासाठी पुढाकार घेऊन संमेलन यशस्वी पार पाडले. आयोजन चमुचे मनःपुर्वक अभिनंदन !

मध्यंतरी एका प्रतिष्ठित वृत्तपत्रात 'चिमण्यांनी रंग बदलला : निसर्गाचा चमत्कार' अशा आशयाची बातमी छापून आली होती. पावसाळ्याच्या सुरुवातीला सुगरण पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो. त्यावेळी नर पक्षी मादीला आकर्षित करण्यासाठी त्यांचा रंग पिवळा होते, ही बाब आपल्या पक्षिमित्रांना आणि अनेकांना माहिती आहे, मात्र एका शिक्षकाने या पक्ष्यांना बघितले आणि त्याचा फोटो काढून आपल्या ओळखीच्या वृत्तपत्र प्रतिनिधीकडे देऊन निसर्गाचा चमत्कार अशी जास्तीची माहिती पुरविली. शिक्षकाने सांगितले म्हटल्यावर प्रतिनिधीनेसुद्धा काही शहानिशा न करता बातमी ठोकून दिली. त्या बातमीवर पक्षिमित्रांमध्ये दिवसभर चर्चा झडली आणि टीकेची झोड उठली. आज प्रत्येक जिल्ह्यात पक्षिमित्रांची उपलब्धता आहे. त्यामुळे माहितीची शहानिशा करण्यास कुठलीही अडचण येऊ नये. मात्र आपल्याला सर्वच कळते अशा अविर्भावात वावरणाऱ्याकडून दुसरी अपेक्षा तरी काय करणार. मात्र अशा घटनांवरून पक्षी विषयावरील प्रबोधनाची आवश्यकता अधोरेखित होते. ही बातमी अमरावती शहरातून लागली असल्याने मी त्याचा पाठपुरावा करून अशा प्रकारचे चुकीचे वृत्त आपल्याकडून अपेक्षित नाही, असे कळवू शकलो. त्यानंतर त्या प्रतिनिधीला समजसुद्धा देण्यात आल्याचे कळले.

विकासाच्या वेगात माणसांची पक्षी आणि एकूणच वन्यजीवांच्या विषयी संवेदनशीलता नष्ट झाली आहे की काय असा विचार करायला लावणाऱ्या काही घटना सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात घडल्या. केरळ राज्यात राष्ट्रीय महामार्ग ६६ च्या रुंदीकरणासाठी तोडण्यात आलेल्या मोठ्या चिंचेच्या झाडाचा व्हिडीओ जेव्हा समाजमध्यामांवरून व्हायरल झाला तेव्हा ते दृश्य बघून अनेकजण हळहळले. पक्ष्यांची घरटी असलेले ते झाड जेव्हा जेसीबीने आडवे केले तेव्हा त्यावर असलेल्या पक्ष्यांची घरटी आणि पिल्ले रस्त्यावर विखुरली. ते दृश्य विदारक होते. त्यानंतर वन विभागाने कारवाई करून काहींना अटक केली. दुसरी अशीच एक घटना त्याच दरम्यान नाशिक जिल्ह्यातील सिन्नर मध्ये घडली. सिन्नरच्या बस स्थानकासमोरील एका हॉटेल समोर असलेल्या चिंचेच्या झाडावर पाणकावळे आणि ढोकरी पक्ष्यांची घरटी होती. पक्ष्यांची विष्ठा खाली पडते म्हणून असंवेदनशील हॉटेल मालकाने त्याच्या फांद्या कापण्याचा घाट घातला. त्यामध्ये ११६ पक्ष्यांची क्षणात हत्या झाली. तिसरी घटना पक्ष्यांविषयीच्या अंधश्रद्धेतून घडली. नाशिक जिल्ह्यातील एका बिबट कातडी तस्करी प्रकरणाच्या तपासात एका घरात गिधाड पक्ष्याचे मुंडके आणि पाय लटकवून ठेवल्याचे दिसून आले. आरोपीची बायको नेहमी आजारी राहत असल्याने भूतबाधा होऊ नये म्हणून भोंदू बाबाच्या सल्ल्याने गिधाडाचे अवयव घरात ठेवल्याची माहिती यातून प्राप्त झाली. पक्ष्यांविषयी अनेक अंधश्रद्धा आहेत. मात्र गिधाडाबाबत हा नवीनच प्रकार समोर आला आहे. एकीकडे विकास आणि दुसरीकडे अशी मध्ययुगीन विचारसरणी बघता पर्यावरणाचे महत्व सर्वसामान्यापर्यंत कधी पोहोचणार असा प्रश्न पडतो. अशा घटना चुकीच्याच अशा प्रतिक्रिया समाजमाध्यामातून उमटल्या, त्यांचा निषेध नोंदविला गेला आणि विशेष म्हणजे या तीनही प्रकरणात वन विभागाकडून तातडीने कार्यवाही केल्या गेल्या, हा एक चांगला संदेश दिला गेला ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणावी लागेल.

पुढिल महिन्यात ५ ते १२ नोव्हेंबर दरम्यान पक्षी सप्ताह येऊ घातलेला आहे. महाराष्ट्र शासन,वनविभाग तसेच महाराष्ट्र पक्षिमित्रचे सर्व सभासद व संलग्नित संस्था हा सप्ताह उत्साहात साजरा करतीलच यामध्ये आपण सर्वजन सहभागी होऊ या.

*****

# पक्ष्यांचे नंदनवन सोलापूरमध्ये ३४ वे राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलनाची गोड सांगता


**इंजि. अनिल भगिरथ जोशी**

९४०४२९५५०९




सोलापूर शहर, परिसर व जिल्ह्यात पक्षी वैभव खूप मोठ्या प्रमाणावर आहे. भारतात आढळणाऱ्या एकूण पक्ष्यांच्या प्रजातींपैकी जवळपास २० टक्क्यांवर पक्ष्यांच्या प्रजाती सोलापूर जिल्ह्यात आढळतात. त्यामुळे पक्षी पर्यटनाला मोठा वाव आहे. सोलापूर जिल्ह्याचे वन क्षेत्र हे भौगोलिक क्षेत्राचे जवळपास २ टक्के आहे. सोलापूर जिल्हा माळरान व गवताळ प्रदेश म्हणून ओळखला जातो. माळरान आणि गवताळ प्रदेश या निसर्गातील प्रमुख परिसंस्था असून यांचे संरक्षण होणे खूप आवश्यक आहे. सोलापूर जिल्ह्यात नान्नज अभयारण्य, बोरामणीचा माळरान, हिरज, गंगेवाडी, इत्यादी ठिकाणी बरेच पक्षी आढळतात. तसेच हिप्परगा तलाव, संभाजी तलाव, होटगी तलाव, उजनी जलाशय, कुरनूर जलाशय इत्यादी ठिकाणीसुद्धा अनेक स्थानिक व स्थलांतरित पक्षी मोठ्या प्रमाणावर आढळतात. विशेषतः हिवाळ्यात परदेशी पाहुणे पक्षी यांची उपस्थिती पाणथळावर मोठ्या प्रमाणावर आढळते. माळरान पक्षी, पाणथळ पक्षी, शिकारी पक्षी, झुडपातील पक्षी म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील निसर्गाने दिलेला अनमोल खजिना आहे. तसेच वृक्षांनी नटलेले स्मृती उद्यान, सिद्धेश्वर वनविहार इथेसुद्धा खूप मोठ्या प्रमाणावर पक्षी वास्तव्य करतात.

म्हणूनच मला असे वाटते की सोलापूर हे पक्ष्यांचे नंदनवन आहे असे म्हटलं तर वावगे ठरणार नाही.

इंडियन बर्ड मॅन असे ख्याती प्राप्त, पक्षी अभ्यासक स्व. डॉ. सालीम अली यांच्या रोजनिशीमध्ये नोंदी पाहिल्या तर सोलापूर जिल्ह्यातील नान्नज अभयारण्य हे त्यांचे आवडते ठिकाण होते हे आढळून येईल.

सोलापूर जिल्ह्यामध्ये वनक्षेत्र कमी असूनसुद्धा येथील जैवविविधता खूप मोठ्या प्रमाणावर आढळून येते. जवळपास ३७२ किंबहुना त्यापेक्षा जास्त प्रकारचे पक्षी येथे आढळतात. पक्षी हे या जैवविविधतेमधील सर्वात मोठा घटक आहे. पक्षी हे निसर्गचक्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

आपल्याला माहीत आहे, पक्षी हे बीज प्रसारक आहेत, निसर्गातील घाण साफ करण्यासाठीचे महत्त्वाचे कार्य करतात, अनेक प्रकारचे कीटक, उंदीर, घूस, साप इत्यादींच्या संख्यावाढीवर पक्षी नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. आणि विशेष म्हणजे ही सर्व कामे ती आपल्यासाठी मोफत करतात. त्यासाठी कोणतेही शुल्क आपल्याकडून घेत नाहीत. मनुष्याने थोडा विचार करावा की जर या कीटकांची संख्या प्रमाणापेक्षा जास्त वाढली तर मनुष्याचे किती नुकसान होईल.

वाढत्या लोकसंख्येमुळे निसर्गावर परिणाम झाल्याचे आपल्याला दिसून येते. शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे जंगलाचा ऱ्हास होत आहे हेसुद्धा दिसून येते. एकंदरीतच या जंगलाच्या ऱ्हासामुळे पक्ष्यांच्या व प्राण्यांच्या अधिवासावर परिणाम झालेला आहे. त्यामुळेच आपल्याला दिसून येते, मनुष्य-वन्यप्राणी यांचा संघर्ष सुरू आहे. आणि तो वाढत चालला आहे. आणि हे जर आपल्याला नको असेल तर त्यांना त्यांचा अधिवास दिलाच पाहिजे. आपण वृत्तपत्रातून नेहमी वाचतो की, 'बिबट्या शहरात घुसला' वगैरे.

अहो, ते करणार तरी काय? कारण आपण त्यांच्या घरात घुसलो आणि आपल्याला हवा तसा विकास करून घेतला मग त्यांनी जायचे कुठे? ते आपल्या घरात घुसणार नाही का? यावरती आपण मनुष्याने नक्कीच विचार करायला हवा आहे. शासनाने वन कायदे भरपूर बनवलेले आहेत ते आपण मनुष्याने जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आहेत हे समजून घ्यायला हवे.

आज अनेक प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या कमी होताना आपल्या निदर्शनास येते. काही पक्षी तर अति संकटग्रस्तच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. जसे की आपल्या माळरानावर बागडत होता तो माळढोक पक्षी, गिधाड इत्यादी. आपल्या माळरानावरची शान माळढोक, सापमार गरुड, काळवीट,

हरीण, लांडगा, कोल्हा, खोकड इत्यादी आहेत. तसेच पाणथळांवरील परदेशी पाहुणे बार हेडेड गुज व इतर असे फ्लेमिंगो, हळदी-कुंकू इत्यादी असे पक्षी. यांच्या संवर्धनासाठी आपण प्रयत्न करायला हवे.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेमार्फत ५ नोव्हेंबर मा. मारुती चितमपल्ली यांचे जन्मदिनापासून ते १२ नोव्हेंबर स्व. डॉ. सालीम अली यांच्या जयंतीपर्यंतचा आठवडा २०१७ पासून पक्षी सप्ताह साजरा करण्याचे सुरू झाले आणि शासन स्तरावर याचा पाठपुरावा संघटनेने केला, त्याचे फलित म्हणून महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर २०२० रोजी त्याला मान्यता दिली आणि संपूर्ण राज्यात नोव्हेंबर २०२० मध्ये वनविभाग व पक्षिमित्र संघटनेने पक्षी सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला. सोलापूरकरांसाठी आनंदाची गोष्ट म्हणजे या २०२० वर्षी मारुती चितमपल्ली आपल्या मातृभूमीत सोलापूरला परतले. आणि आम्ही पक्षिमित्रांचे भाग्य की, मारुती चितमपल्ली सरांसोबत पहिला शासकीय पक्षी सप्ताह साजरा करता आला. यावेळी निनाद शहा, नरेंद्र गायकवाड, अनिल जोशी, नितीन वडगावकर, अरुण शिखरे, साठे आदी उपस्थित होतो.

आजवर झालेल्या अनेक संमेलनांपैकी नुकतेच एक ३४ वे राज्यस्तरीय पक्षिमित्र संमेलन सोलापूरमध्ये ७, ८, व ९ जानेवारी रोजी फडकुले सभागृहात पार पडले. हे सोलापुरातील ३ रे राज्यस्तरीय संमेलन होते. यासाठी राज्यभरातून व परराज्यातून पक्षिमित्रांनी हजेरी लावली.

७ जानेवारी शुक्रवारी दोन कार्यशाला आयोजन करण्यात आल्या. जख्मी पक्षी यावरती डॉ. शिवानी तांडेल (मुंबई), डॉ. संजय गायकवाड (नाशिक), राजकुमार कोली (सोलापूर) यांनी मार्गदर्शन केले तर 'वाइल्डलाइफ फोटोग्राफी' यावरती अनंथमुर्ती (बंगळूर), आनंद मागास व अरुण सामक यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे उदघाटन राज्याचे वनराज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. वन खात्याकडून जैवविविधता जपण्यासाठी गवत लागवड केली जात आहे आणि वन्यप्राण्यासाठी पाणवठ्याची संख्या वाढवली जात आहे. शासनाकडून पक्ष्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असेही पालकमंत्री म्हणाले. पशु-पक्ष्यांच्या वाढत्या संख्या बघता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी रेस्क्यू उपचार केंद्रे सुरू व्हावीत, अशी पक्षिमित्रांनी मागणी केली. संध्याकाळी या कार्यशाळेनंतर पक्षिमित्रांनी सोलापूरचे चविष्ट असे भोजन पिठलं-भाकरी याचा आस्वाद घेतला.

माळढोक पक्षी, धाविक, घार, क्रेन, काळवीट, लांडगा यांचे पुतळे वन विभागाकडून सभागृह समोरील गवतावर ठेवण्यात आले. या पुतळ्याभोवती माती, गवत- झुडपे ठेवल्याने त्यांच्या अधिवासाचा भास होत होता. हे पुतळे सर्वाचे लक्ष्य वेधून घेत होते आणि पक्षिमित्रांसाठी हे 'फोटो पॉईंट' तयार झाले.

शनिवारी (८ जानेवारी) रोजी सकाळी वर्धा, नाशिक, लातूर, ठाणे येथून सायकल वरती पक्षिमित्र आले. यावेळी त्यांचे स्वागत डॉ. व्यंकटेश मेतन, प्रा. डॉ. निनाद शाह, इंजि. अनिल जोशी, महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. संमेलनातील परिसंवाद, चर्चासत्राचे उद्घाटन स्वागताध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते झाले. तसेच महाराष्ट्र पक्षीमित्रच्या ४ दशकपूर्ती निमित्त काढलेल्या अंकाचे प्रकाशन व प्रा.डॉ.निनाद शाह यांच्या बर्ड चेकलिस्ट ऑफ सोलापूर याचे ही प्रकाशन मान्यवराच्या हस्ते झाले. सोलापुरची ओळख पक्षी पर्यटनासाठी होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला. अनेक पक्षिमित्रांनी श्री. मारुती चितमपल्ली यांना पाहण्याची व यांच्याकडून व्याख्यान ऐकण्याची इच्छा आयोजकांकडे व्यक्त केली होती. त्यामुळे मारुती सरांची थोड्या वेळासाठी त्यांच्या परवानगीने मुलाखत ठेवण्यात आली.

पक्षी त्यांच्या ठरलेल्या अधिवासात ठराविक काळानंतर बरोबर एका ठिकाणाहून दुसरीकडे जातात कारण त्यांना ग्रह, तारे यांचे ज्ञान असते आणि ते पाहून त्यांना दिशा ओळखता येतात. असे अरण्यऋषी म्हणाले. पक्षी निरीक्षण करताना त्याच्या नोंदी डायरीत करणे गरजेचे असते जे पुढे भविष्यात कामी येते असेही ते म्हणाले.

राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री. सुनील लिमये हे म्हणाले की, पक्ष्यांमुळे माणसाचे आयुष्य सुखदायी होते. कारण पक्षी हे माणसाने केलेली घाण स्वच्छ करण्याचे काम करत असतात.

दुपारच्या जेवणात पक्षिमित्रांनी सोलापूरच्या 'हुग्गी'चा आस्वाद घेतला.

संध्याकाळी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेच्या आजीव सदस्यांची बैठक पार पडली. पुढील काळात युवा, शेतकरी, व पक्षी मैत्री

संमेलन घेण्याचे ठरवण्यात आले. तसेच प्रत्येक जिल्हा प्रतिनिधी व विभाग प्रतिनिधी, व इतर संघटनेचे कार्य वाढविण्यासाठी नेमण्याचे ठरले.

रविवारी (९ जानेवारी) सकाळी ६ ते ९ असे पक्षिनिरीक्षणाचा आनंद पक्षिमित्रांनी घेतला. हिप्परगा तलाव येथे मनोज कुलकर्णी व सिद्राम पुराणिक यांनी उपस्थितांना माहिती दिली. माळरानावरील पक्ष्यांची माहिती उपस्थितांना नरेंद्र गायकवाड, अनिल जोशी, ओकारनाथ गये, बाळा लांबतुरे, अजय हिरेमठ यांनी दिली तर सिद्धेश्वर वनविहार येथे संजय भोईटे यांनी माहिती दिली. माळरानावर ३७ प्रकारचे पक्षी यावेळी दिसले. इतके मोठे माळरान पाहून सोलापूरकर भाग्यवान आहेत, असे उपस्थित पक्षिमित्र म्हणाले. माळढोक येथील वैभव तर आहेच शिवाय विविध प्रकारची जैवविविधता इथे पाहायला मिळते असेही पक्षिमित्र म्हणाले.

सत्रामध्ये इला फाऊंडेशनचे डॉ. सतीश पांडे यांनी घुबडाच्या अधिवासाबद्दल माहिती दिली व त्यांच्याबद्दलची अंधश्रद्धा चुकीची असल्याने व त्यांना अशुभ मानणे हे थांबवले पाहिजे असे म्हणाले. पुण्यात लवकरच वन्यजीवांसाठी रेस्क्यू सेंटर सुरू करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

अनेक पक्षिमित्रांची सत्रे या दोन दिवसात झाली. प्रत्येकानेच अभ्यासपूर्ण माहिती आपल्या पीपीटीमधून मांडली. पाहता-पाहता संमेलनाचे तीन दिवस कसे संपले कळले नाही. आणखी १-२ दिवस पुढे असायला हवे होते, असे वाटत होते. आणि संमेलन यशस्वी झाल्याचे सर्वांना आनंद झाला.

संमेलन यशस्वी करण्यासाठी आयोजकाची धडपड तर सुरूच होती. परंतु त्यांच्या प्रत्येक हाकेला धावून पळणारे, पहिल्या बैठकीपासून न चुकता शेवटच्या बैठकीपर्यंत उपस्थित राहणारे, ज्यांच्या शिवाय हे संमेलन यशस्वी पार पडणे कठिणच म्हटले तर वावगे ठरणार नाही, असे सिंहाचा वाटा असलेले, असे पडद्यामागील कार्यकर्तेव विहंग मंडळाचे सदस्य श्री. नरेंद्र गायकवाड (अध्यक्ष), डॉ. निनाद शहा (संमेलनाध्यक्ष), इंजिनिअर श्री. अनिल जोशी (संमेलनाच्या स्मरणिकेचे संपादक), श्री. सिद्राम पुराणिक, श्री. धनंजय शहा असे पक्षिमित्र कार्यकर्तेहेच होते.



*****

# पावसाळ्यातील पक्षी दर्शन

जुलै महिना. पावसाळ्याचे दिवस. १० जुलै सकाळी साडेसात वाजता घरातून घराजवळच असलेल्या राणाप्रताप उद्यानात जाण्यासाठी छत्री घेऊन निघालो. राहत असलेल्या नातुबाग परिसरात रस्त्याच्या कडांना अनेक प्रकारची झाडे आहेत. रस्त्याने जाताना आकाशाकडे नजर गेली. बदामाच्या झाडाच्या शेंड्याच्या पर्णहीन फांदीवर राखी धनेश पक्ष्याने दर्शन दिले. थोडे पुढे गेल्यावर फूटपाथ वर साळुंकीची एक जोडी दिसली. बागेत गेल्यावर कावळ्याची काव काव ऐकू आली. आकाशातून पावसाचे थेंब टपकत होते.

घरी परत आल्यावर खिडकीतून बाहेर दृष्टी फिरवली. कावळ्याच्या जोडीतील एकाने झाडाची वाळलेली काटकी चोचीत पकडलेली दिसली. लगेचच ती जोडी उडून गेली. उंच इमारतीवर पारव्यांची लगबग चालू होती. तारेवर तीन पोपट बसलेले दिसले. खिडकीसमोर असलेल्या रायआवळ्याच्या झाडावर एक खार आवाज करताना दिसली. जवळच एक शिंपी पक्षी आवाज करीत एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारताना दिसला. नाचरा पक्ष्यानेही पंखांचा पिसारा फुलवत दर्शन दिले. लालबुड्या बुलबुलची जोडीही दिसली.

कोकीळचा स्वर आणि बुलबुल पक्ष्याच्या आवाजाने पहाटेच जाग येते. ११ जुलैला तर साडेनऊ वाजता शिपाई बुलबुल पक्ष्याने पूर्व बाजूस उघड्या असलेल्या खिडकीच्या जवळ येऊन आडव्या गजावर क्षणभर बसून दर्शन दिले आणि लगेच उडून गेला. परिसरात नारळ, फणस, चिक्कू, अशोक, सोनचाफा,वड, पिंपळ, औदुंबर, कडूनिंब, जांभूळ, आंबा, साग, रायआवळा अशी अनेक मोठी झाडे तसेच नागचाफा, पारिजातक, तगर, मधुमालती अशी फुलझाडे, वेली आहेत. त्यामुळे पक्ष्यांना सहारा आणि अन्नही मिळते. भारद्वाज पक्षी ही अधूनमधून आवाज करीत दर्शनही देतो. दयाळ पक्ष्यांची जोडी ही अधून मधून परिसरात दिसते.

सायंकाळी पोपटाचे थवे एकापाठोपाठ पूर्वेकडून पश्चिमेकडे, पक्षिधामाकडे जाताना दिसतात. त्यावेळी आठवतात ते एका गीतातील शब्द,

**सायंकाळी एकेमेळी द्विजगण अवघे वृक्षी ।**
**अरुणोदय होताच उडाले चरावया पक्षी ।।**

मात्र दर्शन होत नाही ते अंगणातील पक्षी चिमणीचं! त्या संबंधात आठवते ती चिमणी-कावळ्याची गोष्ट. 'चिमणीचं घर मेणाचं, कावळ्याचं घर शेणाचं'. चिमणीसाठी शहरात मेणाची घरे म्हणजे अंगण, लाकडी खण, माळवदं असलेली घरे, वाडे आता अस्तित्वात नाहीत. कावळा मात्र काटक्या जमवून झाडांवर घरटे करताना दिसतो. त्यासोबत कोकीळ पक्ष्याचा वावरही आसपास दिसतो. त्यांचा आवाज आपलं लक्ष वेधून घेतो.

पंख असलेले जीव म्हणजे पक्षी. त्यांना आपण पाखरंही म्हणतो. पावसापासून संरक्षणासाठी त्यांचेजवळ ना छत्री ना रेनकोट. झाडे-झुडूपे, वृक्ष-वेली पाखरांना छत्र सावली देऊन सहारा देतात. विश्वनिर्मात्याने त्यांना पंख बहाल केले आहेत. त्या पंखांच्या सहाय्याने पक्षी आकाशात संचार करतात, तसेच मायेची पाखर पसरून अंड्यांचे आणि पिल्लांचे संगोपन करतात.

१६ जुलैला घराकडे येताना चौकातील दोन इमारतींमधील आडव्या तारेवर ३६ पारवे एका रांगेत बसलेले दिसले. संध्यासमयी आकाशाकडे नजर गेली. ११ घारींचा थवा आकाशात घिरट्या घालताना दिसत होता. दिवसभर ऊन पावसाचा खेळही चालू होता.

आपली दृष्टी सजग असेल तर आपण राहत असलेल्या परिसरातील पक्ष्यांच्या दर्शनाचा आनंदही आपण घेऊ शकतो.

**बाळासाहेब कुलकर्णी**
पुणे.
९८२२४६५४१०.

****

# मेरी आवाजही पहेचान है



**शरद आपटे**
९८९०३८४४००

'मेरी आवाजही पहचान है' या गीताने एक उच्चांक गाठला तो लता मंगेशकर यांच्या निधना नंतर. दीदींचा आवाज हीच त्यांची खरी ओळख आहे हे त्यांनी स्वतः अनेक वेळा सांगितले आहे, ते अगदी खरे आहे.

खरेतर प्रत्येक माणसाचा आवाज हा त्याची ओळख असतो, जसे आपल्या बोटांचे ठसे. आपल्या बोटांचा ठसा जसा एकमेव द्वितीय असतो तसाच आपल्या आवाजाचा ठसा (स्पेक्ट्रोग्राम) एकमेव द्वितीय असतो. आवाजावरून व्यक्ती ओळखणारी आज अनेक मशीन्स आहेत, ऍप्सही आहेत. बोटाच्या ठश्याने जसे व्यक्ती ओळखता येते तसेच ते आहे. बोटाचे ठसे त्या यंत्रात प्रथम भरावे लागतात (आधारकार्ड) तसेच आवाजाचेही आहे. आवाज आधी यंत्रात भरावे लागतात मगच ते तो आवाज ओळखू शकते.

प्रख्यात अभिनेत्यांच्या आणि प्रसिद्ध व्यक्तींच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करणारे कलाकार फार पूर्वीपासून गावो गावी आहेत.आज असे कलाकार त्या अभिनेत्यांऐवजी त्यांचे आवाज सिनेमात, जाहिरातीत देतात आणि ते इतके हुबेहूब असतात की, आपणही फसतो. मात्र ही नक्कल मशीन बरोबर ओळखते. कारण ज्या व्यक्तीची नक्कल केली आहे त्या व्यक्तीच्या स्वरयंत्रातून आलेला मूळ स्वर त्या मशीनला माहीत असतो त्याची नक्कल कोणालाही करता येत नाही. तो आवाज एकमेव द्वितीय असा असतो.

ही सगळी प्रस्तावना कशासाठी? मार्लिन बर्ड आय.डी. ऍप फॉर इंडिया' या नावाचे पक्ष्यांच्या आवाजावरून वन्य पक्षी ओळखण्याचे एक ऍप येऊ घातले आहे. तुम्ही मस्त जंगलात आहात. दाट झाडीतून सुरेल आवाज येत आहेत. पक्षी दिसतही नाही. चला, ॲप उघडा आवाज रेकॉर्ड करा मशीन लगेच तुम्हाला पक्ष्यांचे नाव सांगेल त्याचा फोटो दाखवील आणि त्याची इतर माहितीही पुरवील. तसेच त्या पक्ष्यांचे इतरही प्रकारचे आवाज तुम्हाला ऐकवील.

मॅकलॉय लॅब (The Macaulay Library), कॉर्नेल लॅब ऑफ ऑर्नीथॉलॉजी आणि बर्ड काउंट इंडिया डिस्कशन ग्रूप या संस्थांनी मिळून हा घाट घातला आहे.कॅनडा आणि यू.एस.ए. येथील ४०४ प्रजातींच्या पक्ष्यांचे आवाज तंतोतंत ओळखणारे ॲप यशस्वी झाल्यानंतर असे ॲप आता आर्जेन्टिना, चिली, भारत, मेक्सिको, न्यूझीलंड, न्यूओट्रॉपिक, वेस्टर्न पॅलिॲट्रिक या प्रदेशातील १५३४ प्रजातींसाठी प्रायोगिक तत्वावर ॲप तयार होत आहे. भारतासाठी हे ॲप १८४ प्रजातीसाठी असेल. या प्रकल्पावर जगभरातील १५४ पक्षी आवाज तज्ञ काम करीत आहेत. भारतासाठी १७ तज्ज्ञांचा चमू निवडण्यात आला आहे त्यात माझाही सहभाग आहे. १८४ प्रजातींच्या प्रत्येकी १०० ध्वनिमुद्रित आवाज आम्ही तपासणार आहोत.

**मशीन लर्निंग :**

लहान मुलाला आपण रंग शिकवितो. लाल, पिवळा इ. हे शिकविताना ते रंग किंवा त्या रंगाच्या वस्तू दाखवितो, मगच त्या मुलाला रंग कळतात. तसेच चित्रे किंवा समक्ष प्राणी दाखवून कुत्रा, मांजर, गाय अगदी वाघसुद्धा ओळखायला शिकवितो. तसेच काव काव कावळा, चिव चिव चिमणी, भोऽऽभो कुत्रा असे प्राण्या-पक्ष्यांचे आवाजही शिकवितो. ते मूल आता हे रंग, वस्तू, प्राणी पक्षी त्यांचे आवाज ही ओळखू लागते. समजा आपण पिवळा हा लाल म्हणून शिकविला तर तो पिवळ्याला लालच म्हणेल. म्हणजे इथे शिकविणारा महत्त्वाचा असतो.

याच पद्धतीने विविध पक्ष्यांच्या प्रजातींचे आवाज या मशीनला शिकवावे लागतात आणि ते आम्ही तज्ज्ञ मंडळी करीत आहोत.

आपण वन्य प्राण्यांचे, पक्ष्यांचे फोटो अनेक माध्यमावर देतो तसेच त्यांचे आवाजही दिले जात असतात. त्यात पक्ष्यांच्या आवाजाचा वाटा फार मोठा आहे. मीच आज मितीस भारतात आढळणाऱ्या ३९२ प्रजातींच्या पक्ष्यांच्या विविध प्रकारच्या

आवाजाची ३२०० ध्वनिमुद्रणे ईबर्ड या वेब साईटवर सादर केली आहेत. अशी लाखो ध्वनिमुद्रणे सादर झालेली आहेत आणि रोज होत आहेत. हा संग्रह आमचा डेटा बेस आहे. यातील १८४ प्रजातींची प्रत्येकी १०० ध्वनिमुद्रणे निवडून ती तपासली जाणार आहेत. यातूनच त्या मशीनचे प्रशिक्षण आणि आवाज ओळखण्याची कसोटी होणार आहे.

१०० पैकी पाच फाईल्स या संदर्भ फाईल्स असतील. ती ध्वनिमुद्रणे आदर्श म्हणून असतील. ज्या प्रजातीच्या आवाजाचे ध्वनिमुद्रण आहे त्या प्रजातीच्या आवाजाची स्पष्टता आणि इतर तांत्रिक बाबी उत्तम असतील. नंतर तपासल्या जाणारी २० ध्वनिमुद्रणे ही सर्वसामान्य लोकांनी ध्वनी मुद्रित केलेली असतात, त्याला तांत्रिक निकष लागू असत नाहीत. हे आवाज मशीन बरोबर ओळखते का हे तपासायला वापरले जातील. नंतर येणारी ८० ध्वनिमुद्रणे हे तांत्रिक निकष बऱ्यापैकी पूर्ण करणारे असतील. ही ध्वनिमुद्रके मशीनला शिकविण्यासाठी वापरली जातील. अशा तीन निकषातून तावून सुलाखून निघालेले हे ॲप यशस्वी काम करेल. मात्र कावळ्याचा आवाज कावळ्याचा म्हणून सांगणारा प्रत्येक पक्षी आवाज तज्ज्ञ महत्त्वाचा आहे. त्याने कावळ्याला चिमणी म्हणून शिक्का मारला तर मशीन कावळ्याचा आवाज चिमणी म्हणून सांगेल.

अमोटेशन:– हा शब्द नेहमी येत राहील. या इंग्रजी शब्दाचा अर्थ शब्दकोशात 'तपासणे' त्यावर भाष्य करणे असा आहे. मशीन लर्निंग/प्रशिक्षण हे कसे होणार आहे, ते आपण सोपे उदाहरण देऊन पाहूया.

लाल बुडी बुलबुल या पक्ष्याचे उदाहरण पाहूया. आमच्याकडे या पक्ष्याच्या १०० ध्वनिमुद्रिका असतात. या ध्वनिमुद्रिका जिथे जिथे हा पक्षी आढळतो तेथून आलेल्या असतील म्हणजे त्या भारताबाहेरही ध्वनिमुद्रित झालेल्या असतील. ही फाईल विशिष्ट सॉफ्टवेअरमध्ये उघडली जाते. तिथे तपासणाऱ्याला स्पेक्टोग्राफ (आवाजाचा ठसा) दिसेल. तज्ज्ञाला आवाज ऐकताना तो कोणत्या पक्ष्याचा आहे आणि तो कोणत्या स्पेक्टोग्राफचा आहे हे प्रथम समजणे महत्त्वाचे आहे. स्पेक्टोग्राफच्या डाव्या अक्ष्यावर आवाजाची फ्रिक्वेन्सी (ध्वनितरंगाची वारंवारता) दिसते. आणि आडव्या अक्ष्यावर वेळ दिसेल.

**(आकृती क्रमांक १)**






Figure 1 लालबुडी बुलबुल

इथे आपण प्लेबॅक करायचे आणि जिथे बुलबुल ऐकू येतो आणि तो नक्की बुलबुलचाच आहे याची खात्री झाली की, त्या स्पेक्टोग्राफला तंतोतंत चौकट घालायची. ध्वनिमुद्रिकेत जितक्या वेळा बुलबुलचा आवाज आहे त्यापैकी किमान पाच स्पेक्टोग्राफना चौकट घालायची. चौकट घालताना ध्वनी तरंगाची लांबी रुंदीशिवाय हर्मोनिक्स (तबल्यावर आपण एकच थाप मारली की, एक आवाज येतो मात्र त्यानंतर तबल्याचे कातडे पुढे कंप होत राहते आणि त्यातून कमी तीव्रतेचा ध्वनी येत राहतो त्याला उप ध्वनितरंग म्हणता येईल, जसे पाण्यात आपण दगड टाकला की एक तरंग उमटतो आणि तो पुढे पुढे जात राहतो त्याच वेळी मागून आणखी लहान लहान तरंग येत राहतात त्यांना आपण हर्मोनिक म्हणू शकतो) या चौकटीत यायला हव्यात पण आवाजाचा प्रतिध्वनी त्यात येता कामा नये. इथे आणखी एक काळजी घ्यावी लागते ती म्हणजे पक्ष्याने धोक्याचा इशारा देण्यासाठीकेलेले आवाज, पिलाने अन्न मागण्यासाठी केलेले आवाज, शत्रूला भिवविण्यासाठी केलेले आवाज किंवा शत्रूने पकडल्यावर केलेले आवाज यांना चौकट बद्ध करायचे नाही. कारण हे एकतर क्वचित असतात आणि मशीनला शिकविण्यासाठी तेवढ्या संख्येने मिळायला हवेत.

**(आकृती क्रमांक २)**



तांबटसारखे) गात नाहीत. एक प्रयोग म्हणून कावळा (कावळा हा गाणाऱ्या पक्ष्यांच्या गटात मोडतो.) आवाज करताना कान देऊन ऐका. त्याच्या प्रत्येक काव, काव मध्ये थोडा थोडा फरक जाणवेल. माझा जवळील बुलबुल पक्ष्याच्या एका ६ मिनिटांच्या ध्वनिमुद्रिकेत त्याने ६२ वेळा आवाज केला आहे त्यात त्याने २६ वेळा वेगवेगळे आवाज केले आहेत. असे सर्व आवाज मशीनला शिकवावे लागतील.

दुसऱ्या टप्प्यात बुलबुल सोबत इतर कोणते पक्षी आहेत ते ओळखून त्याला वरीलप्रमाणे चौकट बद्ध करणे. थोडक्यात बुलबुल सोबत आणखी कोण कोणते पक्षी असू शकतात याची कल्पना येऊ शकते. या आवाजासोबत पक्ष्याचे आवाज आहेत पण पक्षी ओळखता येत नसेल तर अनोळखी पक्षी म्हणून त्याही आवाजाला चौकट बद्ध करायचे आहे. इतके झाल्यावर असा काही भाग असतो ज्यात फक्त बॅकग्राउंडचा (हवेचा, वाऱ्याचा, प्राणी, कीटक, थोडक्यात पक्षी सोडून इतर आवाज) आवाज असतो अश्या एक सेकंद लांबीच्या भागाला चौकट बद्ध करायचे. यावरून बुलबुल पक्ष्याचा परिसर कसा असू शकतो याची कल्पना येते.

या पद्धतीने प्रत्येक प्रजातीच्या १०० ध्वनी मुद्रिकेतील अनेक आवाजांचे ग्राफ या मशीनमध्ये भरले जातात. प्रत्येक ग्राफ हा विशिष्ट गणिती पद्धतीने एका अंकात बदलला जातो. सरते शेवटी तो अंक हा त्या पक्ष्याचा आवाज ठरतो. तुम्ही जेंव्हा एखादा आवाज या ॲपमध्ये ध्वनिमुद्रित कराल तेव्हा तुमचे ॲप त्याचे अंकात रुपांतर करील. त्या अंकाशी मशीन मेमरीतील अंक जुळला की, पक्षी ओळखला जाईल. ही प्रक्रिया अत्यंत जटील आहे मात्र ती एकदा तयार झाली की, सगळा आकड्याचा खेळ होतो आणि उत्तर बिनचूक येते.

मी जेव्हा शामा पक्ष्याचा आवाज तपासत होतो तेव्हा मला या पक्ष्याच्या मलेशिया, थायलंड, व्हिएतनाम आणि हवाई बेटात ध्वनिमुद्रित केलेल्या फाईल्स ऐकायला मिळाल्या. मला आश्चर्य वाटले हे आवाज मी ओळखू शकलो. मी ऐकत असलेले शामाचे आवाज हे पश्चिम घाटातील, तरीही या आवाजात काहीतरी साम्य जाणवत होते.

लवकरच हे ॲप लोकांच्या हातात येईल. लोक पक्षी आणि त्यांचे आवाज ओळखतील. ते आवाज प्लेबॅक करून त्यांना झुडपातून फोटोसाठी बाहेर ही बोलावू शकतील. अशा वेळी तो पक्षी माझ्या हद्दीत कोण घुसखोर शिरला आहे असे समजून खाणे पिणे सोडून त्याचबरोबर दोन हात करायच्या तयारीने घुसखोर शोधायला बाहेर येतो आणि त्याची दिनचर्या बिघडते, इतकेच नाहीतर तो मानसिक तणावात जातो. विणीच्या हंगामात असे आवाज सतत वाजविले तर त्या नराला माझ्यापेक्ष्या प्रबळ नर इथे आहे असे वाटून तो नर तो परिसर सोडून जाण्याची शक्यताही असते. याची काळजी प्रामाणिकपणे सर्वांनी घ्यायला हवी.

इतके झाल्यावर पक्षी ओळखणे त्यांची जीवन पद्धती समजणे सोपे होईल. ते त्याच्या संवर्धनासाठी उपयुक्तही असेल म्हणून पक्षी प्राणी वाचतील? आपल्याला काय वाटते? गेल्या ५० वर्षांचा इतिहास काय सांगतो?


*****




## हार्दिक अभिनंदन

कोल्हापूर येथील आपले सभासद **श्री. सुभाष पुरोहित** यांच्या या प्रकाशचित्रा जगभरातून आलेल्या ६५०० प्रकाशचित्रांतून निवड होऊन इंग्लंडमधील विषयावरील जागतीक स्पर्धेत **'मेरीट'** पुरस्कार मिळाला आहे. महाराष्ट्र मक्षिमित्र तर्फे श्री. सुभाष पुरोहित यांचे अभिनंदन !

# हरहुन्नरी श्याम घाटे



१७ जुलै २०२२ सकाळी श्याम घाटेजींचे कर्करोग आणि हृदय विकारामुळे निधन झाले. 'होप' संस्थेचा आधारस्तंभ गेला. श्याम घाटेजीं यांच्यामुळेच होप ठाणे संस्थेची स्थापना झाली. २५ वर्षेआधी बीएनएचएसच्या कार्यक्रमांना आम्हा ठाणेकरांना मुंबई-कुलाब्यात जावे लागे. तसे प्रोग्राम ठाणे येथे घेण्यासाठी आम्ही व्यवस्था बघत होतो, घाटेंनी पुढाकार घेऊन ठाणे रोटरी क्लबतर्फे होप संस्था स्थापन केली आणि सहयोग मंदिरमध्ये आमच्या बीएनएचएससारख्या शास्त्रीय कार्यक्रमाकरता एक व्यासपीठ मिळाले. दर आठवड्यात कार्यक्रम सुरू झाले. ठाणेकरांचा भरघोस प्रतिसाद मिळायला लागला. आणि त्याच वर्षी ठाण्यात पर्यावरणाविषयी दोन-तीन संस्था पण सुरू झाल्या. त्याबरोबर त्यानी 'महाराष्ट्र पक्षीमित्र' चळवळीकरता पण चांगले योगदान दिले.

होपतर्फे ठाण्यात दोन (ओवळा, रंगायतन) 'महाराष्ट्र राज्य स्तरीय पक्षिमित्र संमेलने' आयोजित केली गेली. १९९७ च्या १७ व्या पक्षिमित्र संमेलनात बीएनएचएसच्या पाठिंब्यामुळे पक्षिमित्र चळवळीला शास्त्रीय वळण लागले. त्या संमेलनात, बीएनएचएसतर्फे हुमायून अब्दुलाली, एस.पी. गोदरेज, डॅनिअल, आयझक किहिमकर सारख्यांची पक्षिशास्त्रावर भाषणे झाली. बीएनएचएसचे शोधनिबंधही पेश झाले.

तेव्हापासून बीएनएचएसचा मराठी पक्षिमित्र संमेलनात सक्रिय सहभाग सुरू झाला.

गेली २ वर्षे होपतर्फे नवोदित पक्षिमित्रांच्या सादरीकरणासाठी दोन पारितोषिके दिली जात आहेत, ती पारितोषिके घाटेंनी दिलेल्या शब्दाप्रमाणे होपतर्फे पुढील पक्षिमित्र संमेलनात पण दिली जातील...

त्याचप्रमाणे होपने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ठाणे विद्यार्थी पक्षिमित्र संमेलने' ठाण्यातील इतर संस्थांबरोबर आयोजित केली,

आणि घाटे यांच्या पुढाकाराने दर वर्षी ३-४ वेळा ठाणे पक्षी गणना सुरू झाली. त्या निरीक्षणांच्या शास्त्रीय excel नोंदणी घाटेजी स्वतः करत....

ते स्वतः चांगले अभ्यासू वक्ते होते. अनेक संस्थांना ते भरघोस मदत पण करत. खूप लोकांना व्यक्तीशः मार्गदर्शन करायचे.

तसे श्याम घाटेंच्या व्यक्तिमत्त्वाला इतर अनेक पैलू होते.

आयआयटी कानपूरचे केमिकल इंजिनिअर, स्वतः कॅपकॉन ऑरगॅनिक प्रायव्हेट लिमिटेडचे डायरेक्टर होते आणि आयआयएम अहमदाबादला मॅनेजमेंट लेक्चर द्यायला जायचे. त्याचबरोबर त्याना अनेक छंद होते. पक्षी छायाचित्रणाकरता भारतांतील हिमालय ते कन्याकुमारी अभयारण्यांना भेटी दिल्या. त्यांना फोटोग्राफीत अनेक पारितोषिके मिळाली. त्यांचा हत्ती झुंजीचा sanctuary चा फोटो मुंबईत फ्लोराफाऊंटनला झळकला होता. घाटेजी सामाजिक कार्यातही शेवटपर्यंत अग्रेसर होते.

ठाण्यातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर भागात पर्यटकांनी टाकलेल्या प्लास्टिक कचरा सफाई मोहिमेत भाग घेत. तसेच मुंबईतील 'आरे जंगल वाचवा' अभियानामध्ये अग्रस्थानी असत. बांधवगढ़ व्याघ्र प्रकल्पांत अनेक आठवडे राहिले. तेथे स्थानिक मुलांकरता पर्यावरणाविषयी मार्गदर्शन करत होते. तेथील अनेक सामाजिक प्रकल्पात योगदान पण दिले.

असा हरहुन्नरी पर्यावरण तज्ज्ञ, संयोजक आपल्याला कायमचा सोडून गेला, यावर अजून विश्वास बसत नाहीये.

श्याम घाटेंच्या आत्म्यास सद्गती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-अनिल कुंटे**
९८२०२४५४७०

*****

# असा हा पक्षिमित्र



असा माणूस जगात विरळाच. ह्याचं नावं मारुती कुदळे. माझा आणि मारुती कुदळेंचा परिचय तसा १९८२ सालापासून आहे. कुदळेंचा जन्म १९५० सालचा. राहतात हनुमान टेकडीच्या अगदी पायथ्याशी. कांचन गल्लीत. त्यांचे घर अगदी शेवटचे आणि टेकडीचा उंचवटा त्यांच्या घरातूनच जाऊन पुढे टेकडीत रूपांतर करतो. घर छोटेखानीच परंतु सुंदर छोटा बगीचा आणि समोरच्या मंदिरानी नटलेले.

छोटे बैठे घर एकमजलीच आणि त्यावर एक मोठी गच्ची. केवळ पाखरांसाठीच केली असावी. रोज सकाळी साधारण शंभरएक पारव्यांचा थवा बसलेला असतो गच्चीवर. त्यांना भरपूर दाण्या–पाण्याची सोय असते. आपण त्यांच्या घराजवळील पाऊलवाटेने गेलो आणि चुकून मोठ्याने आरडाओरडा केला तर भरऽऽरऽऽर असा पंखांच्या फडफडण्याचा मोठा भरीव आवाज होऊन पाखरांचा प्रचंड थवा त्यांच्या बागेवरून जाळीदार सावल्या हलवत उडून जातो. तेव्हा जाणीव होते की, एवढ्या संख्येने हे खगगण इथे शांतपणे बसले होते. या पारव्यांच्या आधी काळे चकचकीत मोठे कावळे आणि साळुंक्यांचा थवा आपली क्रमवारी लावून गेलेला असतो. नंतर सूर्यास्तापर्यंत या गच्चीवर पारव्यांचेच राज्य.

मारुती कुदळे हे १९७० सालापासून सूर्योदयाच्या सुमारास नियमित हनुमान टेकडी चढतात आणि टेकडीवरील देवळाची साफसफाई झाल्यानंतर मूर्तीला स्नान घालतात. परिसर स्वच्छ करताना सुचतील ती देवाची गाणी म्हणतात, अगदी स्वत:शीच!

नियमित टेकडी चढल्यामुळे मंदिर सफाईचे सत्कार्य करताना त्यांना आसपास वावरणाऱ्या आणि वृक्षांवर बसलेल्या विविध पक्ष्यांची संगत मिळाली. त्यांच्या हालचाली आणि मोहक आवाज त्यांच्या मनाला भुरळ पाडू लागले. त्यातून या विविध जातींच्या पक्ष्यांची स्वभाव विशेषत: त्यांना जाणवू लागली. तसेच ऋतू बदलामुळे पक्ष्यांवर होणारे परिणामही त्यांना समजू लागले. तेथे तेच पक्षी नियमाने येतात आणि आपल्याला रामराम करतात व आपला नमस्कार स्वीकारतात, असं त्यांना खात्रीने कळू लागलं. त्याच पक्ष्यांची पावसाळ्यातली आनंदी वृत्ती आणि उन्हाळ्यात होणारी त्रेधातिरपीट त्यांना समजली. उन्हाळ्यात पाण्यासाठी होणाऱ्या त्यांच्या उघड्या चोची त्यांना पाहवेनात. त्यांनी ठरवलं की, आपण यांची नियमित सेवा करायची. ताबडतोब टेकडीवरील काही झुडपांमध्ये व छोट्या वृक्षांवर मातीची छोटी मडकी बांधली आणि रोज सकाळी दोन मोठे ड्रम घेऊन त्यात पाणी भरून टेकडीवर चढून ती मडकी भरायला सुरुवात केली. शिवाय मधल्या पाऊलवाटांवर विविध प्रकारच्या धान्याचे दाणे विखरून ठेवायला सुरुवात केली.

हे कार्य ते १९७० ते १९८० च्या दरम्यान दर शनिवारी करीत. कारण रोज एवढा वेळ त्यांना देता येत नसे. परंतु यानंतर १९८० सालापासून आज तागायत श्री. कुदळे या पक्ष्यांना रोज चारा–पाणी घालतात आणि आता तर पक्षी चांगलेच सोकावले आहेत. ते त्यांच्या आगमनाची वाट पाहतात आणि आश्चर्य म्हणजे जर टेकडी चढायला त्यांना उशीर झाला तर पायथ्याशी येऊन त्यांच्या घराभोवतालच्या झाडीत बसून कलकलाट करतात. या कलकलाटात कोकिळा आणि बुलबुल यांचा विशेष भाग असतो. मग कुदळेसाहेब पाण्याचे ड्रम आणि धान्याची पिशवी घेऊन घराबाहेर पडले की, फांद्या–फांद्यांतून कलकलाट करत त्यांना समांतर टेकडीवर येतात. हे दृश्य शक्यतो उन्हाळ्यात बघायला मिळते आणि मोठी मौज वाटते.

नियमित चारापाणी घेण्यासाठी येणारे पक्षी म्हणजे... १५ ते २० होले, सातभाईंचे अनेक जथ्थे, बुलबुल, ग्रे टिट, कावळे, रॉबिन, साध्या चिमण्या, भारद्वाज, कोतवालाची जोडी, चष्मेवाले आणि सर्वांत आश्चर्य म्हणजे एक तितैरची जोडी डुलत डुलत येते

आणि पटापट दाणे टिपून आपला कार्यभाग आटोपून निघून जाते. क्वचित एखादा हळद्या येतो आणि बासरी वाजवत आणि पिवळाशार सूट घालून आपले वेगळेपण दाखवतो. तो पाण्यावर येतो परंतु जमिनीवर काही उतरत नाही. हिवाळ्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत शामाचे जोडपे पाण्यासाठी येते; पण नंतर काही दिसत नाही.

या सर्व पक्ष्यांच्या साथीला गुबगुबीत शेपटाच्या छोट्या छोट्या रामाच्या खारी दाणे आणि पाण्यावर येतात. पिकऽऽपिक आवाज करत मोठा दाणा मिळविण्यासाठी सैरभैर धावतात. मधूनच बहुतेक त्या भांडत असाव्यात. कधीकधी दूरवर ठेवलेल्या भांड्यांकडे मोर येतात आणि जमिनीवर ठेवलेल्या दगडी भांड्यांवर ससे येत असावेत, रात्रीच्या वेळी. कारण दिवसा त्यांच्या लेंड्या दिसतात. कित्येक वेळा कुदळेंना धामणीचे दर्शन झाले आहे आणि कधी तरी नागही दिसतो.

सर्व पक्षी आणि प्राण्यांना कुदळेंची एवढी सवय झाली आहे की, त्यांना एकमेकाना भेटल्याशिवाय राहवतच नाही. हा स्नेह तर दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यासाठी त्यावेळी असलेल्या एखाद्या समारंभाचे आमंत्रणही ते स्वीकारत नाहीत. कोणत्या पक्ष्याचे आगमन केव्हा होणार, कोण येऊन गेला, कोण येणार आहे हे ते सर्व खात्रीने सांगतात आणि ते तसंच घडत असतं. कोण भांडकुदळ आहे, कोण शांत आहे, कोण किती खातो-पितो हे त्यांच्याकडून ऐकण्यात खूप मजा आहे.

श्री. कुदळे अशी या रानपाखरांची ४० वर्षे सेवा करीत आहेत. यावर त्यांचे कौतुक केले तर ते म्हणतात, 'माझी मागच्या जन्मीची फार मोठी पुष्पाई असेल म्हणून देव माझ्याकडून हे काम करून घेत आहे.'

**राजेंद्र प्रधान**
पुणे.
9890829806.

*****

## IGEN IVD Volunteer Reorganization Award 2021







इन्स्टिट्यूशन ऑफ ग्रीन इंजिनिअर्स (IGEN) या आंतरराष्ट्रीय संस्थेतर्फे आपल्या महाराष्ट्र पक्षिमित्र ला २०२१ चा आंतरराष्ट्रीय आयजीइएन आयव्हीडी स्वयंसेवक पुरस्कार (IGEN IVD Volunteer Reorganization Award 2021) प्राप्त झाला. संस्थेला मिळालेले प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह.

# आपल्या माहितीला उजाळा - भाग ५

महाराष्ट्र पक्षीमित्रसंघाच्या त्रैमासिकेचे प्रयोजन केवळ पक्षी निरीक्षण व ओळख या पर्यंतच मर्यादित राहत नाही. त्या संलग्नीत ज्ञान भांडाराची उजळणी करून घेण्यासाठी आपल्या माहितीला उजाळा हे सदर वाचकांच्या पुढ्यात ठेवत आहे. प्रत्येक अंकामध्ये दहा प्रश्नांचा संच दिला जाईल. वाचकांना त्याची उत्तरे शोधून आपल्याकडे असणाऱ्या महितीला उजाळा द्यायचा आहे.प्रत्येक प्रश्नासोबत पुरविलेला सुगावा संपूर्ण क्रियाकलापास रंजक बनवतील अशी अपेक्षा आहे. वाचकांनी आपली उत्तरे अंकामध्ये इतरत्र दिलेल्या उत्तरासोबत पडताळून पाहू शकता. या सदराबद्दल प्रश्न, चर्चा किंवा सूचनांचे स्वागत आहे.

-राघवेंद्र वंजारी
rvanjari@yahoo.co.in

| क्र. | प्रश्नथोडी | मदत |
|---|---|---|
| १. | किवी हा कोणत्या देशाचा राष्ट्रीय पक्षी आहे? | हा देश महा सागरातला एक द्वीपसमूह आहे. |
| २. | Pied Avocet चे मराठी नाव काय? | याची चोच वरच्या दिशेने वाकलेली असते |
| ३. | गटात न बसणारा पक्षी ओळखा.<br>गव्हाणी घुबड, मानमोडी, बेडूकतोंड्या,ढोकरी, पिंगळा | हा पक्षी दिनचर आहे. इतर सगळे निशाचर. |
| ४. | तामिळनाडू राज्याचा राज्य पक्षी कोणता? | हा पक्षी सदाहरित वनात आढळतो. |
| ५. | पक्षी आणि त्यांच्या अधिवासाच्या सहसंबंधाचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा कोणती? | अन्स्टे हॅकल यांनी १९६६ साली हे नाव दिले? |
| ६. | चित्रातले पक्षिशास्त्रज्ञ ओळखा.  | यांनी पक्षी शास्त्रामध्ये अनेक प्रजातींची नावनोंदणी केली. |
| ७. | Birds of south Asia :<br>a Ripley guide या पुस्तकाची लेखिका कोण? | हे अमेरिका देशाचे पक्षिशास्त्रज्ञ आहेत. |
| ८. | Capitonidae... या पक्षी कुटुंबात --- चा समावेश होतो. | हे पक्षी झाडाचे खोड पोखरून घरटी करतात. |
| ९. | हा दिवस जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून साजरा केला जातो | हा दिवस जागतिक कावीळ दिन .म्हणून प्रचलित आहे. |
| १०. | डार्विन --- या पक्ष्यांच्या चोचींची निरीक्षणे जगप्रसिद्ध आहेत. | या पक्ष्यांची चोच बिया खाण्यासाठी विकसित झाली आहे. |

*****

## शाम घाटे सरांना विनम्र श्रद्धांजली

ठाणे येथील पर्यावरण प्रेमी, पक्षिमित्र शाम घाटे साहेब गेल्याची बातमी सकाळीच कळली. वाचून प्रथम विश्वासच बसला नाही. तातडीने त्यांचे सहकारी श्री अनिल कुंटे यांना फोन केला. अन त्यांनी बातमी खरी असल्याचे सांगितले. धक्कादायक बातमी होती. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे अल्पश्या आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने पर्यावरण क्षेत्राची निश्चितच हानी झाली आहे. घाटे सर हे महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजीवन सभासद होते, 'होप नेचर ट्रस्ट'चे ते विश्वस्त होते, ते बीएनएचएसचेसुद्धा आजीव सभासद होते. अनेक वर्षापासून ठाण्यात पर्यावरण विषयक चळवळीत सहभागी होते. पक्षी निरीक्षण असेल, निसर्ग भ्रमण असेल किंवा पर्यावरण संवर्धन या विषयात त्यांनी अनेकांना मार्गदर्शन केले होते. नवोदित पक्षिमित्र किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्या नवोदितांना ते सातत्याने मदत करीत असत, प्रोत्साहन देत असत. मी त्यांना बऱ्याच वर्षापासून ओळखत होतो. परंतु आमचा चांगला परिचय झाला, तो ठाणे येथे २०१७ साली झालेल्या ३१ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात. या संमेलनाच्या आयोजनात ते प्रमुख होते. त्यावेळी आमची निवास व्यवस्था त्यांनी स्वतः जातीने लक्ष देऊन केली होती, आणि दुसऱ्या दिवशीच्या ठाणे खाडीतील पक्षी निरीक्षणासाठी ते त्यांच्या गाडीने आम्हाला घेऊन गेले होते. त्यानंतर पुढील पक्षिमित्र संमेलनात होपतर्फे देण्यात येणाऱ्या नवोदित पक्षिमित्र पुरस्काराच्या निमित्ताने आमचे सातत्याने बोलणे होत असे. ठाण्यात जेव्हा पहिले विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन घेण्यात आले होते, त्यावेळी त्यांनी मला आवर्जून बोलावले होते. या वर्षी सोलापूर येथे झालेल्या पक्षिमित्र संमेलनात आम्ही तीन नवोदित पक्षिमित्रांना पुरस्कार दिले. त्यावेळी त्यांना बहुदा तब्बेतीच्या कारणामुळे येता आले नाही, मात्र पुरस्कार राशीचे धनादेश तत्परतेने पाठविले. होप तर्फे देण्यात येणारे नवोदित पक्षिमित्र पुरस्कार महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात नियमितपणे कसे देता येतील व त्यासाठी काय करता येईल याबाबत त्यांचेशी माझे मागील वर्षात बरेचदा बोलणे झाले होते.

या वर्षी नवोदित पुरस्कार मिळालेल्या कु. मृणाली राऊत हिने मुंबईला एम.एस्सी.साठी प्रवेश घेतला तेव्हा तिला मुंबईमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी जातीने लक्ष घातले, तिला आवश्यक ती मदत केली. अतिशय शांत स्वभाव, मृदू व आर्जवी बोलणे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व कायमच स्मरणात राहील. बीएनएचएसच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकी दरम्यान त्यांचे माझे बोलणे झाले होते. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे घाटे सरांना विनम्र श्रद्धांजली.

**-डॉ. जयंत वडतकर**

*****

## नामशेष होण्याच्या मार्गावर

काही दिवसांपूर्वी एका संस्थेने पक्ष्यांच्या स्थितीचा आढावा घेतला होता. त्यात आकाराने मोठे असलेलेले व काही वैशिष्ट्यपूर्ण पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, अशी भीती व्यक्त झाली होती. त्यातील काही पक्षी जायंट आयबिस, सुलू हॉर्नबिल, चॅथम शॅग आणि सेचेलिस स्कॉप्स आऊल हे ५० ते १०० च्या संख्येत शिल्लक आहेत.

## रात्रीचे शिलेदार : घुबड

आंतरराष्ट्रीय घुबड जागरुकता दिवस हा दरवर्षी ४ ऑगस्ट रोजी जगभरात साजरा केला जातो. घुबड या पक्ष्याविषयी जनमानसात जनजागृती व्हावी या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. घुबडाबाबत लोकांमध्ये सर्वाधिक गैरसमज आहेत.

## रामसर क्षेत्र ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यात यंदा फ्लेमिंगोच्या संख्येत वाढ

मुंबईतील सतर ठिकाणांपेक्षा ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये यंदा फ्लेमिंगोची संख्या जास्त आढळून आली आहे. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (बीएनएचएस) ने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये ठाणे खाडी किनारी २५,००० फ्लमिंगो दिसून आले होते. ही संख्या यंदा मार्च महिन्यात ५४,००० एवढी होती.

(महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र, जुलै २०२२ वरून)

# स्वागत नविन सभासदांचे
## ( दि. ०१ एप्रिल २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२)

| Membership No. | Name of Member | Place |
|---|---|---|
| 1365 | Mr. Kiran Pardeshi | Aurangabad |
| 1366 | Mr. Devendra M. Telkar | Akola |
| 1367 | Mr. Adhish M. Devasthali | Ratnagiri |
| 1368 | Sau. Lina P. Dhenge | Nagpur |
| 1369 | Dr. Chetna Ugale | Wardha |
| 1370 | Mr. Anil Manohar Chitre | Mumbai |
| 1371 | Mr. Sanket M. Patil | Jalgaon |
| 1372 | Mr. Shyam G. Sawarkar | Akot |
| 1373 | Mr. Yogesh B. Cheke | Buldhana |
| 1374 | Mr. Shriraj S,. Bhosale | Ahmadnagar |
| 1375 | Ku. Samta N. Kasture | Buldhana |
| 1376 | Mr. Sudhir R. Yelve | Satara |
| 1377 | Mr. Vikas P. Bawankule | Bhandara |
| 1378 | Mr. Mandar D. Ahinave | Pune |
| 1379 | Mr. Sunil E. Payghan | Aurangabad |
| 1380 | Dr. Ravikumar B. Shinde | Buldhana |
| 1381 | Mr. Popat M. Mehare | Aurangabad |
| 1382 | Ku. Devanshi P. Chaudhari | Jalgaon |
| 1383 | Mr. Haresh H. Shah | Nashik |

**आपल्या माहितीला उजाळा प्रश्नांची उत्तरे –**

०१) न्यूझिलॅण्ड  ०२) उचाट्या  ०३) मानमोडी Jynx torquilla

०४) पाचू होला Common emerald dove C. indica  0५) परिस्थितीकी Ecology

०६) थॉमस जेर्डन  ०७) पामेला रासमुसेन  ०८) तांबट

०९) २८ जुलै  १०) गोरली (Finches)

## टपाल तिकिटांच्या दुनियेत

## शेकाट्या

(Black winged stilt)

पावसाळा संपत आला की आपल्याकडील पाणथळ प्रदेशांवर पक्ष्यांचा वावर दिसू लागतो. त्यामध्ये काही पक्षी परदेशातून स्थलांतर करून येतात तर काही पक्षी स्थानिक स्थलांतर करतात. शेकाट्या हा स्थानिक स्थलांतर करणारा पक्षी हमखास आपणास पाणथळ जागांवर दिसून येतो.

हा पक्षी साधारणपणे टिटवीच्या आकाराएवढा असतो. याचे पंख काळे असतात तर पोट व इतर भाग पांढरा असतो. याचे डोके गोल असते व चोच लांब व अणकुचीदार असते. याचे पाय गुलाबी रंगाचे व एक फुटाएवढे लांब काटकुळे असतात. या लांब पायांमुळे उथळ पाण्यात व चिखलात जलद हालचाल करणे सोपे जाते. त्यामुळे चिखलातील किडे व गोगलगायी सहजरीत्या खाऊ शकतो. हे पक्षी नेहमी थव्याने दिसून येतात. पाण्याच्या काठाने किंवा दलदलीच्या भागात पाण्यावर तरंगणारे किडे, छोटे मासे व बेडकांची पिल्ले यासारखे आपले भक्ष्य शोधताना दिसून येतात.

शेकाट्या नर व मादी सारखेच दिसतात. मादीचे डोके पांढरे असते तर नराच्या डोक्यावर काळी पिसे असतात व विणीच्या हंगामात या पिसांचा रंग जास्त गडद होतो. हे पक्षी आपली घरटी पाण्याच्या काठावर खोलगट भागात बांधतात. घरटे बांधताना शेवाळे व पाणवनस्पतींचा वापर केला जातो.

अशा या देखण्या पक्ष्यावर थायलंड सरकारच्या टपाल विभागातर्फे १९९७ मध्ये ७ बाथ या किमतीचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे.

**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in




*****

## महाराष्ट्र पक्षीमित्रचे
### आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/- + ५००/- (अंक निधी)
आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

**सभासद कसे व्हाल ?**

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे-इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :- महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Website : www.pakshimitra.org

---

### त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ५५,०००/- ते ६०,०००/-रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

## महाराष्ट्र पक्षीमित्र
(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

### सभासद अर्ज

प्रति,
मा.अध्यक्ष,
महाराष्ट्र पक्षीमित्र
महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : ____________________
संपूर्ण पत्ता : ____________________
____________________
फोन नं. __________ मो. __________
ई-मेल ____________________
जन्मतारीख : ____________________
शिक्षण : ____________________
नोकरी/व्यवसाय : ____________________
छंद : ____________________

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)
कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.
श्री/श्रीमती यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

| दिनांक | **अध्यक्ष** | आपला |
|---|---|---|
| **अर्ज मंजूर/नामंजूर** | **महाराष्ट्र पक्षीमित्र** | सही |

**टिप** : सभासद अर्ज आपल्या वेबसाईटवर ''ऑनलाईन'' पध्दतीने सुध्दा भरता येईल

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

# काळ्या शेपटीच्या पाणटिवळा या पक्ष्याने अवघ्या ५ दिवसांत पार केलं सायबेरिया ते मुंबईचं अंतर



हिवाळ्यात काळ्या शेपटीचा पाणटिवळा (Black Tailed Godwit (Limosa limosa)) हे स्थलांतरित पक्षी मुंबईतील ठाणे खाडी परिसरात मुक्कामाला येतात व मार्च महिन्यात ते आपल्या मायभूमीत परततात. हिमालय पर्वतरांगांवरील सायबेरिया, रशिया आणि चीन या देशांत त्यांचे मूळ घर आहे. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (बीएनएचएस) या संस्थेने काळ्या शेपटीच्या पाणटिवळ्याला यंदाच्या मार्च महिन्यात जीपीएस टॅगिंग केले होते. बीएनएचएस चे शास्त्रज्ञ व स्थलांतरित पक्षी तज्ञ डॉ. एस. बालाचंद्रन यांच्या नावावरून या टॅग केलेल्या पक्ष्याला बाला हे नाव देण्यात आले होते. या बाला पक्ष्याने एप्रिल महिन्यात ठाणे खाडी परिसर सोडला. दि. २४ मार्च ला प्रवास सुरु करून या पक्ष्याला सायबेरिया गाठायला ४७ दिवस लागलेत. ५००० किमी चा हा प्रवास त्याने पाकीस्थान, अफगाणिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान, कजाकिस्तान व तुर्कमेनिस्तान असे सहा देश ओलांडून व अनेक ठिकाणी मुक्काम करून दि. ११ जून ला हा पक्षी आपल्या मूळ ठिकाणी पोहोचला. त्यानंतर हा पक्षी हिवाळ्यात परत येणे अपेक्षित असताना सप्टेंबर महिन्यातच भांडूप पम्पिंग स्टेशनला दिसून आला. जीपीएस टॅग असल्याने शास्त्रज्ञांनी त्याची माहिती काढली असता, परतीचा प्रवास त्याने अवघ्या पाच दिवसात न थांबता दि. १७ ते २१ जुलै या कालावधीत पूर्ण केला. स्थलांतर अभ्यासातील ही एक महत्वाची उपलब्धी मानली जात आहे.




**Book Post**

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : गौरी एंटरप्राइजेस, नाशिक
**मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन**